शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं//माध्य-३०२/स्थलांतर पर.पुवि/२०१७ 12699
दिनांक : - 9 APR 2018

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे संचलित कानसे, ता.आंबेगाव, जि. पुणे येथील माध्यमिक शाळेचे आढले खुर्द , ता.मावळ जि.पुणे येथे केलेल्या स्थलांतरास मान्यतेबाबत

संदर्भ : १.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र. जिप/माध्य/प्रमा/६७७/१२, दिनांक २७.८.२०१२
२.या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/पुवि/माध्य-३/१३/स्थलांतर/२३१९२-९५ २०११-१२, दिनांक २०.९.२०१२ चे पत्र
३.मा.प्रविण मुंढे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२ यांचे पत्र जा.क्र.माशास्थ/३३१६/प्र.क्र. २६९/एसएम-१ दिनांक २९.९.२०१७

उपरोक्त विषयाबाबत सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे संचलित कानसे, ता.आंबेगाव ,जि. पुणे येथील माध्यमिक शाळेचे आढले खुर्द, ता.मावळ जि.पुणे येथे केलेल्या स्थलांतरास मान्यता देणेबाबत या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्र. १ नुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून शिफारशीसह प्राप्त झालेला प्रस्ताव संदर्भीय पत्र क्र. २ नुसार या कार्यालयामार्फत शासनास सादर केलेला होता.

सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे या संस्थेस, कानसे ता.आंबेगाव जि.पुणे येथे इयत्ता ८ वी मराठी माध्यम, कायम विना अनुदानित तत्वावर सन १९९९-२००० पासून सुरु करण्यास शासनाने क्रमांक नमाशा-१०९९/(६८२/९९)/माशि-१, दिनांक ९.७.१९९९ अन्वये परवानगी दिली. तथापि ग्रामस्थांच्या त्रासामुळे संस्थेस त्या ठिकाणी शाळा सुरु ठेवता आली नाही. संस्थेने शासनाची मान्यता न घेता सन २००३-२००४ पासून आढले खुर्द,ता. मावळ जि.पुणे येथे माध्यमिक शाळा सुरु केली. या शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याची विनंती संस्थेने केलेली होती. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती.

मौजे आढले खुर्द, ता.मावळ जि. पुणे येथे शाळा सुरु करण्याबबत संस्थेने केलेला खुलासा विचारात घेऊन सदर माध्यमिक शाळेच्या स्थलांतरास खालील नमूद अटी व शर्तीवर शासनाने संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार कार्योत्तर मान्यता दिलेली आहे.

१. सदर शाळेची मान्यता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी काढलेली नसल्याची तसेच याबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसल्याची खात्री करण्यात यावी.
२. सदर शाळेमध्ये विहित निकषानुसार किमान पटसंख्या असणे आवश्यक राहील.

३. स्थलांतरापूर्वीच्या सर्व विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत/ स्थलांतराच्या ठिकाणी समायोजन केले आहे व याबाबत कोणतीही तक्रार/ आक्षेप नाही याची खात्री करण्यात यावी.

४. स्थलांतरापूर्वी शाळेत कार्यरत असलेल्या अर्हताप्राप्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना स्थलांतरीत ठिकाणी सामाऊन घेण्यांत आलेले आहे. व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल करण्यात येणार नाही, तसेच स्थलांतराच्या ठिकाणी शिक्षक/शिक्षकेतर पदे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात आली आहेत. याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या आदेशानुसार, शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील, याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र घेण्यात यावे.

६. स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

७.शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २८.८.२०१५ नुसार विहित केलेल्या संच मान्तेच्या सुधारित निकषानुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या आदेशानुसार अनुज्ञेय होणाया पदाइतके शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी प्राथमिक शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत रहाणार नाहीत हे संस्थेस बंधनकारक राहील.. तसेच अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचा-यांमधून समायोजनाने भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

८. शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी,वेतन / वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ बाबत शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय, आदेश इ. चे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. या अनुषंगाने शाळेबाबत युडायस क्रमांक, सरलची माहिती, संच मान्यता व विद्यार्थी आधारकार्ड नोंदणी याची पूर्तता करणे आवश्यक राहील.

९. सदर शाळा मूळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजुरी राहील.

१०.सदरहू स्थलांतरा संदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्य करण्याचे अधिकार शासनास राहतील.

११. भविष्यात शासन मान्यतेशिवाय शाळेचे स्थलांतरण करण्यात येणार नाही, याची संस्थेने नोंद व दक्षता घेणे आवश्यक राहील.

वरील अट क्रमाक ४ व ५ ची पूर्तता झाल्यावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करावी व केलेलया कार्यवाहीबाबत शासनास ,शिक्षण संचालनलय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) व या कार्यालयास कळविण्यात यावे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.प्रविण मुंढे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. श्री.गहिन्नाथ ढाकणे, अध्यक्ष, सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, २५ नारायणपेठ, पुणे-४११०३०.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/ शाळा नांव बदल/२०१९/10082
दिनांक : 14 NOV 2019

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : शाळेच्या नांवात बदल करणेबाबत
माध्यमिक विद्यालय आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे
ऐवजी
समाजभुषण मोतीलाल शर्मा विद्यालय, आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे

संदर्भ : १. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/सांक्र/२०१९/४६४९, दिनांक ११.९.२०१९
२.मा.अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.एसएसएन-१०९६/७४६०/माशि-१, दिनांक ३.१२.१९९८

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यांत येते की, सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ, पुणे या संस्थेने मासिक सभा दिनांक ३०.५.२०१९ नुसार माध्यमिक विद्यालय आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे ऐवजी समाजभुषण मोतीलाल शर्मा विद्यालय, आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे असा नावांत बदल करण्याचे ठरविले आहे.

| जुने नांव | नवीन नांव |
|---|---|
| माध्यमिक विद्यालय आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे | समाजभुषण मोतीलाल शर्मा विद्यालय, आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे |

संदर्भ क्रमांक २ चे शालेय शिक्षण विभाग,मुंबई यांच्या दिनांक ३.१२.१९९८ चे परिपत्रकानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांच्या कार्यालयाचे दप्तरी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यांत यावी.

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव कार्यवाहीसाठी रवाना
माध्यमिक विद्यालय आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे ऐवजी समाजभुषण मोतीलाल शर्मा विद्यालय, आढले खुर्द ता.मावळ जि.पुणे

VADGAON - MAVAL
DIST:- PUNE
MAH/CCRA/14/YEAR - 2000

INDIA Rs.0008000 PB 0005
STAMP DUTY MAHARASHTRA

(अक्षरी रु. आठ हजार फक्त)

पावती क्र. ९७ दिनांक २९/११/०८
व सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ
पुणे ४१ तर्फे अध्यक्ष
ग. पा. ढाकणे

(सही) २१-११-०८
दुय्यम निबंधक मावळ

(सही) २९/११/०८
दुय्यम निबंधक मावळ

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL
दुय्यम निबंधक वडगांव मावळ

म. व. ल.
१३३० | १ | १०
२००८

मि. वि.
तिखे कार्यालय,
४२, बुधवार पेठ,
गणपती चौक, पुणे २. फोन : २४४५६६७६

**नमुना म. को. नि. ६**
(नियम ११२ पहा)
चलन क्रमांक

सर्वसा. २६-म
Gen.26-M

वडगांव — या ठिकाणच्या कोषागारात / उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलन
भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये / भारतीय स्टेट बँकेमध्ये

| भरणा करणाऱ्याने भरावयाचे | विभागीय अधिकाऱ्याने किंवा कोषागाराने भरावयाचे | कोषागाराने / उपकोषागाराने / भारतीय रिझर्व्ह बँकेची भारतीय स्टेट बँकेने / हैद्राबाद स्टेट बँकेने भरावयाचे |
|---|---|---|
| ज्याच्यावतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नाव / पदनाम आणि पत्ता: सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ पुणे-४१ तर्फे अध्यक्ष ग. पा. ढाकणे. | लेख्यांचे वर्गीकरण<br>विभाग :<br>प्रधानशीर्ष : मुद्रांक व नोंदणी<br>०३० मुद्रांक व नोंदणी<br>उपप्रधानशीर्ष : ०२ मुद्रांक व न्यायिकेतर<br>गौणशीर्ष : १०२ (II)<br>संगणक संकेतांक: ० ० ३ ० ० ४ ६ ४ ० ० | रक्कम मिळाली.<br>रुपये (आकड्यात) ८,०००/-<br>रुपये (अक्षरी) आठ हजार फक्त |
| भरणा करण्यासंबंधीच्या प्राधिकरपत्राचा तपशील आणि भरणा करण्याचा उद्देश<br>**फ्रँकिंगद्वारे मुद्रांकासाठी जमा झालेली रक्कम**<br>भरणा केलेली रक्कम/रुपये ८,०००/-<br>अक्षरी रुपये आठ हजार फक्त<br>भरणा करणाराची स्वाक्षरी (सही)<br>दिनांक २१/११/०८ | बरोबर आहे, पैसे स्विकारावे व पावती द्यावी.<br>(सही)<br>दिनांक<br>दुय्यम निबंधक मावळ | कोषपाल<br>लेखापाल<br>RECEIVED PAYMENT BY CASH<br>21 NOV 2008<br>कोषागार/उपकोषागार/अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक<br>दिनांक<br>FOR UNION BANK OF INDIA<br>MANAGER VADGAON MAVAL BR. |

येथे कोषागारात / येथे रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याचा रबरी शिक्का ठसवावा. (कृपया मागे पहा)

।। श्री गजानन प्रसन्न ।।

# खरेदीखत

खरेदीखत आज दिनांक २४ माहे नोव्हेंबर सन २००८ वार सोमवार इसवी ते दिवशी गांव मौजे 'आढले खुर्द' तालुका मावळ जिल्हा पुणे येथील मिळकतीचे संदर्भात.

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL

म. व. ल.

१६६० [illegible] /२०

२००८

सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ पुणे,
संस्था नोंदणी क्रं. ९०७७-९४,
पुणे, मुंबई अ-जि.एफ/९२८८ पुणे
तर्फे अध्यक्ष–
**श्री. गहिनाथ पाटीलबुवा ढाकणे**
वय वर्षे ५६ धंदा– शेती व नोकरी
राहणार– गणेश गार्डन, फ्लॅट नंबर ४
वडगांव बुा, पुणे– ५१

खरेदीखत लिहून घेणार

**यांसी**

श्री. दत्तु काशिराम येवले
वय वर्षे ८५ धंदा– शेती
राहणार– आढले खुर्द,
तालुका मावळ जिल्हा पुणे

खरेदीखत लिहून देणार

सरकारी मुल्यांकन रक्कम रूपये २,०००००/–

कारणे विनामोबदला खरेदीखत लिहुन देतो की,

१) मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका मावळचे मे. सब रजिस्ट्रार साहेब मावळ यांचे हद्दीतील, जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती मावळचे हद्दीतील, गांव मौजे **आढले खुर्द** येथील गट नंबर २२३ मधील ०४ गुंठे जागेतील **२० फुट x २० फुट = ४०० चौ.फुटाचे आर. सी.सी. बांधकाम यासी ग्रामपंचायत मिळकत नंबर ३५२** यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे:–

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | डोंगर |
| दक्षिणेस | : | पुसाणे शीव |
| पश्चिमेस | : | याच गट नंबर पैकी उर्वरीत क्षेत्र |
| उत्तरेस | : | याच गट नंबर पैकी उर्वरीत क्षेत्र |

THE ... VADGAON MAVAL

१६६० ३ १०
२००८



येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यातील मोकळी जागा, झाड झाडोरा, दगड, माती, तृण काष्ट वल्ली, कडा, मेडा, बांध बांधोरा, जल निधी निक्षेप, बांधकाम, दारे खिडक्या, हवा, उजेड पाणी घेण्याचे तसेच चालु वापराचे व वहिवाटीचे रस्त्याचे हक्कासहित दरोबस्त मिळकत.

२) **मालकी** :— वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही माझे वडिलार्जित मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची असून सदरील मिळकतीचे ग्रामपंचायत उताऱ्यावर मालक म्हणून माझे नांवाची नोंद असून सदरील मिळकतीवर माझेशिवाय इतर दुसरे कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, मालकी ताबे वहिवाट नाही. सदरील मिळकत विक्री करण्याचा तिची विल्हेवाट लावण्याचा मला पूर्ण हक्क व अधिकार आहे.

३) लिहून घेणार ही शैक्षणिक संस्था असून त्यांनी आमच्या गावात ज्ञानगंगा आणलेली असून लिहून घेणार संस्थेला जागेची आवश्यकता असल्याने माझे मालकीची वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार संस्थेला सोईस्कर असल्याने वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहून घेणार संस्थेला कायमस्वरूपी देण्याची माझेकडे विनंती केली. मला समाजसेवा करण्याचे प्रथमपासून आवड असल्याने व आमचे गावात लिहून घेणार ही संस्थेचा ज्ञानदानाचे पवित्र काम करण्याचा जनकल्याणाचा, ज्ञान प्रसाराचा प्रामाणिक हेतु असल्याने मी माझे मालकीची वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहून घेणार संस्थेला विनामोबदला कायमस्वरूपी खरेदी देण्याचे मनोमन ठरविले व आजरोजी वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहून घेणार यांना सदरचे खरेदीखताचे दस्ताने कायमस्वरूपी खरेदी दिली आहे.

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL
म. व. ल.
९६६० | ४ / १०
२००६

४) **ताबा** — वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा मी तुम्हाला आजरोजी खरेदीखतापूर्वी प्रत्यक्ष जागेवर जावुन मोजुन, मापुन हद्दीच्या खुणा दाखवून मालकी हक्काने दिला आहे. सदरील मिळकतीचा तुमचा ताबा या खरेदीखताने मालकी हक्काने कायम करून दिला आहे. ताब्याबाबत माझी काहीएक तक्रार नाही. तुमचे मालकी हक्काचे ताबे वहिवाटीस कोणी हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण मी करून देण्याचे आहे त्याची तोषीस तुम्हांस लागु देणार नाही.

५) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये लिहून घेणार शिक्षण संस्था चालवित असल्याने भविष्यात विद्यार्थ्यांची संख्या जसजशी वाढेल तशी लिहून घेणार यांना ईमारतीचे विस्तारीकरण करावे लागेल ते लिहून घेणार यांनी त्यांचे मनाप्रमाणे व मर्जीनुसार करावयाचे असून सदरच्या लिहून घेणार शाळेच्या संकुलात जाणेयेणेकरीता माझे मालकीच्या याच गटनंतर मधील मिळकतीतून आढले खुर्द ते पुसाणे हा जो जिल्हा परिष्क्षद रस्ता जातो त्या रस्त्यापासून संकुलापर्यंत १० फुट रूंदीच्या जागेचा लिहून घेणार तहहयात विद्यार्थ्यांना जाणेयेणे करीता विनाअट, विनामोबदला वापर व वहीवाट करावयाची आहे. त्याकामी मी अथवा माझे वालीवारस लिहून घेणार यांना कोणत्याही प्रकारची हिल्ला हरकत अथवा अडथळा करणार नाहीत.

६) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी असुन बोजारहित आहे. सदरील मिळकत मी कोठेही गहाण, दान, बक्षिस, लिज, लिन, पोटगी, चोळी, बांगडी चार्ज, असायनमेंट, साठेकरार वगैरे कोणत्याही प्रकारचे जडजोखमीत गुंतविलेली नाही अगर तसा करणेचा तुमचेशिवाय इतर दुसरे कोणाही बरोबर लेखी तोंडी करार मदार केलेला

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL
म. व. ३.
९६६० / ५ / १०
२००८

नाही. तसेच सदरील मिळकतीबाबत मला आजतागायत कोणत्याही सरकारी निमसरकारी खात्याकडून ॲक्वीझीशन, रिक्वीझीशन अगर रिझर्वेशन बाबत नोटीसा आलेल्या नाहीत अगर सदरील मिळकत संपादित झालेली नाही. तसेच सदरील मिळकतीवर मी कोणत्याही प्रकारचे कर्ज काढलेले नाही अगर ती कोठेही तारण गहाण ठेवलेली नाही. त्याचप्रमाणे वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात चालु वादाचा अगर तंटयाचा विषय झालेली नाही. अशा प्रकारे वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही पुर्णपणे निर्वेध निजोखमी असून बोजारहित आहे.

७) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे ग्रामपंचायत उताऱ्यावर तसेच रेव्हेन्यु रेकॉर्डला तुम्ही तुमचे नांवाची मालक म्हणुन नोंद करून घ्यावी. त्याकामी लागणाऱ्या सहया संमती, जाब जबाब, प्रतिज्ञापत्र वगैरे मी विनामोबदला देऊन सर्वतोपरी सहकार्य करेन कोणत्याही प्रकारचा मोबदला मागणार नाही. तसेच सदरील मिळकतीचे आजतागायतचे सर्व सरकारी, निमसरकारी कर, पटटी, टॅक्सेस इत्यादी मी मालकीने भरलेले असून यापुढे तुम्ही वरील मिळकतीचे मालक झाल्याने यापुढे होणारे व बसणारे सर्व सरकारी निमसरकारी कर, पटटी टॅक्सेस इत्यादी तुम्ही मालकी हक्काने भरीत जावुन निरंतरचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरे पाहिजे तशी वहिवाट अगर विल्हेवाट लावावी. तुमचे मालकी हक्कास अगर ताबे वहिवाटीस कोणी हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण मी करून देईन त्याची तोषीस तुम्हाला लागु देणार नाही.

८) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदीखत हे कोणत्याही प्रकारचे गहाणखत अगर परत बोलीचा विषय नसुन तो पुर्णपणे आऊट ॲण्ड आऊट ऑफ सेल या स्वरूपाचा व्यवहार आहे.

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL

| म. व. ल. | | |
|---|---|---|
| ६६६० | ६ | ७० |
| २००८ | | |

६

येणेप्रमाणे वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदीखत मी अक्कलहुशारीने, स्थीर चित्ताने कोणत्याही प्रकारचे दडपण नसतांना अगर कोणत्याही प्रकारचे नशापान न करता पुर्ण स्वसंतोषाने लिहुन सहया/अंगठे करून नोंदवुन दिले असे. सदरील मिळकतीचे खरेदीखत हे माझेवर व माझे वालीवारस हक्कदार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

साक्षीदार

१) [signature]
नांव— श्री खेडकर एस.बी.
पत्ता— मु. आंबळे स्कुल
ता. मावळ

खरेदीखत लिहून देणार

[thumb impression] ड.उ.नि.डा.हा.अं.दा

(श्री. दत्तु काशिराम येवले) यांचा अंगठा
द. अर्ज

२) [signature]
नांव— मारुती रामचंद्र शेडगे.
पत्ता— रा. पुसाणे ता. मावळ.
जि. पुणे

खरेदीखत लिहून घेणार

[signature]
अध्यक्ष
सुसंपन्न ज्ञान प्रसारक मंडळ पुणे-५२

सुसंपन्न ज्ञानप्रसारक मंडळ पुणे,
तर्फे अध्यक्ष—
श्री. ~~महिन्नाथ पाटीलबुवा ढाकणे~~

श्री. महिन्नाथ पाटीलबा ढाकणे.

# ग्रामपंचायत नमुना ८ उतारा (नक्कल)

बुक नं.

पान नं.

क असलेल्या इमारती व जमिनी यांची सन २००८ / २००९ सालाबद्दलची आकारणी यादी

ग्रामपंचायत - आढले खुर्द तालुका - मावळ जिल्हा - पुणे येथील ग्रामपंचायत

ग्रामपंचायतीचा शिक्का

| अ. न. | रस्त्याचे नाव | मिळकत नंबर | मिळकतीचे वर्णन | मालकाचे नाव | भोगवटा करणाराचे नाव | इमारतीचे एकुण क्षेत्र चौ. फुटामध्ये | आकारणी केलेल्या करांची रक्कम: घरपट्टी कर | आरोग्य कर | वीज कर | पाणीपट्टी कर | एकूण कर | अपिलाचे निकाल व मागाहुन फेरफार: घरपट्टी कर | आरोग्य कर | वीज कर | पाणीपट्टी कर | एकूण कर | मागाहुन वाढ किंवा घट झाल्याच्या बाबत हुकुमाचे उल्लेख व शेरे / टीप-शेरे व दुरूस्त्यावर त्यांच्या खरेपणाबद्दल सरपंचाने सही करावी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | ३४२ पुसाणे रस्ता | ३४२ | ५ खुले जागेत ५ × २० × २० = ४०० आर. सी. सी. पद्धतीने बांधकाम | धोंडु काशिराम येवले | सुमन दिनेश प्रसाद मराठे माधव किशोर आढले खुर्द ता. मावळ | ४०० | ४०/- | ५/- | - | - | ४५/- | - | - | - | - | - | मालिक घर बांधले xxx सरपंच | |

येणेप्रमाणे अस्सलवर हुकूम नक्कल अर्जदार श्री. धोंडु काशिराम येवले यांचे अर्जावरून उतारा तयार केला आहे.

नक्कल फी रू. ) मिळाली तारीख

तारीख ७/५/१०/०८ नक्कल तयार करणार (हुद्दा व सही)

ग्रामसेवक ग्रामपंचायत

ग्रामसेवक
ग्रामपंचायत आढले खु.
ता. मावळ, जि. पुणे

THE SEAL OF SUB-REGISTRAR OF VADGAON MAVAL

म. स. ल. ८ ९९९०